दाखल दिनांक : २६/०८/२०१३
नोंदणी दिनांक : २६/०८/२०१३
निकाल दिनांक : १३/११/२०१४
कालावधी : ०१ वर्ष.
०२ महिने.
१७ दिवस.

**विशेष न्यायाधीश पुणे (लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम कायदयाअंतर्गत) यांच्या न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी— सौ. प्राची पी कुलकर्णी)

**स्पेशल केस क्रमांक ६७/२०१३** **निशाणी क्रमांक**

**फिर्यादी** — महाराष्ट्र सरकार
तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे

**विरुध्द**

**आरोपी** — विजय विलास गोंदणे उर्फ टक्कया आण्णा
वय — ३४ वर्ष, धंदा —
रा. २२६, मंगळवार पेठ, पुणे

**भारतीय दंड विधान कलम ४५२, ३५४, ५०६ व बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ८ अन्वये असलेला गुन्हयाचा खटला**

.............................................................................................

सहायक सरकारी वकील श्री जाधव फिर्यादी पक्षातर्फे
आरोपीतर्फे श्री राहुल देशमुख वकील

---

**न्या य नि र्ण य**
(आज दिनांक १३ नोव्हेंबर २०१४ रोजी घोषित)

आरोपी विरूध्द् भारतीय दंड विधान कलम ४५२, ३५४, ५०६ व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयासाठी खटला चालविण्यात आला.

२) अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त स्वरुपात पुढील प्रमाणे आहे. फिर्यादी चंदा बबन जाधव ही २२६ मंगळवार पेठ येथे कुटूंबासह राहण्यास असून ती धुणे भांडयाचे काम करते. दिनांक ५/७/२०१३ रोजी रात्री ००.३० वाजता ती पोटमाळयावर झोपली होती. रात्री २.१५ वाजण्याचे सुमारास तिच्या अंगावरून कोणीतरी हात फिरवीत

असल्याचे तीला जाणवल्याने तीला जाग आली. तीने पाहिले असता तीच्या शेजारी विजय चांदणे हा तीची छाती दोन्ही हातांनी दाबत असल्याचे दिसले. तीने आरडा ओरड केली असता आरोपी तिथून पळून गेला. त्यानंतर दुसरे दिवशी ती तिच्या भावजय सोबत आरोपीच्या घरी विचारणा करण्यासाठी गेली असता तीच्या घराच्या पाठीमागे राहण्यास असलेल्या बेबी सावंत यांच्याकडून तीला समजले की आरोपी फिर्यादीच्या घरून गेल्यानंतर तो बेबी सावंत यांच्या घरात दरवाजा उघडून घुसला होता व त्यांची नात नामे स्वप्नाली शाम सावंत वय — १५ वर्ष हिच्या अंगावर पाणी शिंपडून गालावरून हात फिरवत असतांना तिची नात स्वप्नाली दचकून उठली तीने तिच्या घरी असलेल्या झीरो लाईटच्या उजेडात आरोपी विजयला पाहिले व घटनेबाबत बेबीला व आईला सांगितले. त्यानंतर आरोपी बाहेर जाउन दरवाज्याच्या मागे लपला व तिला वाकुन वाकुन पाहू लागला. बेबी दरवाज्याजवळ गेली असता तो पळून गेला. त्यानंतर बेबीच्या नातीने बेबी व तिच्या आईला झाला प्रकार सांगितला. त्यानंतर फिर्यादी, बेबी व तिची नात स्वप्नाली असे तिघीं तक्रार देण्यासाठी गाडीतळ पोलीस चौकीत आल्या. त्यावेळी तिची मोठी मुलगी नामे निकीता ही तिच्याजवळ रडत येवून सांगू लागली की आरोपीने तिला सुटून आल्यावर बघ मी काय करतो. तिने काय करतो असे विचारले असता केल्यावर विचार  असे म्हणून तीला धमकी दिली. म्हणून त्यांनी सदर घटनेची फिर्याद पोलीस स्टेशनमध्ये दिली.

३)  सदर फिर्यादीवरून आरोपींविरूध्द् गुन्हा क्रमांक १२३/१३ अन्वये नोंद करण्यात आला. फरासखाना पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक व्ही एम कोळी यांनी गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी आरोपीला अटक केली,  साक्षीदारांचे जाबजबाब घेतले, घटनास्थळाचा पंचनामा केला, पिडीत मुलीच्या वयाचा दाखला प्राप्त केला  व गुन्हयाचा तपास पुर्ण करून आरोपीविरूध्द् न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले.

४)  या न्यायालयाने विरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५२, ३५४, ५०६ तसेच लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ७ सह कलम ८ अन्वये निशाणी क्रमांक ५ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपीने त्याच्याावर असलेले आरोप नाकारले व खटल्याच्या सुनावणीची मागणी केली. त्याविषयीची त्याची जबानी निशाणी ६ नुसार नोंदविण्यात आली.

५) प्रस्तूत खटल्यामध्ये आरोपी विरूध्द्चा गुन्हा सिध्द् करण्याकरीतात अभियोग पक्षाने फिर्यादी चंदा बबन जाधव हीची साक्ष निशाणी ८ प्रमाणे नोंदविली. पिडीत मुलगी स्वप्नाली शाम सावंत हिची साक्ष निशाणी ९ प्रमाणे नोंदविण्यात आली. सदर साक्षीदारांची सरकार पक्षास मदत न केल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. सरकार पक्षाने नोंदविलेल्या साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपी विरूध्द् काहीही न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६) वरील सर्व बाबींवरून खालील मुददे माझया विचारार्थ उपस्थीत झाले. त्या मुदयांवरील निष्कर्ष खाली दिलेल्या कारणमिमांसेत मी नमुद केलेले आहेत.

| मुददे | निष्कर्ष |
|---|---|
| १. दिनांक ५.७.२०१४ रोजी पहाटे २.३० वाजता २२६ मंगळवार पेठ पुणे येथे फिर्यादीचे राहाते घरात व त्यानंतर फिर्यादीचे मागील कुमारी स्वप्नाली शाम सावंत हिचे राहाते घरात त्यांच्यावर बलात्कार करण्याच्या उद्देशाने अनाधिकाराने प्रवेश केला व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ४५२ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द् केले आहे काय? | ..... नाही |
| २. वरील तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी व पिडीत मुलगी स्वप्नाली यांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादीची छाती दाबून तिच्या शरीरास स्पर्श केला व पिडीत मुलीच्या तोंडावर पाणी शिंपडून तिच्या गालांना स्पर्श केला व त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून त्यांचा विनयभंग केला व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३५४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द् केले आहे काय? | ..... नाही |
| ३ वरील तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीची मुलगी निकीता वय — १३ वर्ष हिला सुटून आलयावर बघून घेईल अशी धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०६ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द् केले आहे काय? | ..... नाही |

| <u>मुददे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| ४ वरील तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी व पिडीत मुलगी स्वप्नाली वय १५ वर्ष हिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादीची छाती दाबून तिच्या शरीरास स्पर्श केला व पिडीत मुलीच्या तोंडावर पाणी शिंपडून तिच्या गालांना स्पर्श केला व त्यायोगे लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ७ सह कलम ८ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द् केले आहे काय ? | ..... नाही |
| ५ आदेश ? | ..... अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा कमांक १ ते ५ करीता</u> —**

७) आरोपीविरूध्द् दोषारोप ठेवण्यात आलेली सर्व मुद्दे एकाच घटनेतून उद्‌भवले असल्याने त्यांचा एकत्रित विचार केला आहे. आरोपी विरूध्द्चा गुन्हा सिध्द् करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ चंदा बबन जाधव हिची साक्ष नोंदविली. तीने आपल्या साक्षीमध्ये दिनांक ५/७/१३ रोजी रात्री २.१५ वाजता ती झोपली असतांना आरोपीने तिच्या अंगावरून हात फिरवला असे काही घडले नसलयाचे सांगितले आहे. सरकारी वकीलांनी साक्षीदाराचा उलटतपास घेतला परंतु त्यामध्ये सरकार पक्षास सहायय होईल असे काही आले नाही. उलटतपासात तिने सांगितले की आरोपीने निकीताला धमकी दिली असे काही घडले नसल्याचे सांगितले तसेच आरोपी विरूध्द् तिची कसलीही तक्रार नाही.

८) साक्षीदार क्रमांक २ स्वप्नाली शाम सावंत ही पिडीत मुलगी आहे. तीने देखील घटना घडली नसल्याचे सांगितले. तसेच आरोपी तिच्याशी वाईट वागला असे काही घडले नसलयाचे सांगितले. सरकारी वकीलांनी या साक्षीदाराचाही उलटतपास घ ेतला परंतु त्यामध्ये सरकार पक्षास सहायय होईल असे काही आले नाही. उलटतपासात त्यांनी सांगितले की तीची आरोपी विरूध्द् त्यांची कसलीही तक्रार नाही.

९) फिर्यादी व पिडीत मुलगी स्वप्नाली यांनाच आरोपी विरूध्द् कसलीही तक्रार नाही. या दोन साक्षीदारांच्या पुराव्या व्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादी व पिडीत

मुलीशी गैरवर्तन केले असे शाबीत होत नाही. अभियोग पक्षाचा पुरावा आरोपीं विरूध्द् गुन्हा शाबीत करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ ते ४ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्रमांक ५ च्या उत्तरादाखल मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे —

**आदेश**

१. आरोपी विजय विलास गोंदणे याला भारतीय दंड विधान कलम कलम ४५२, ३५४, ५०६ तसेच लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ७ सह कलम ८ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २३५(१) अन्वये निर्दोष सोडण्यात येत आहे.

.सदरची दुरूस्ती निशाणी १ वरील हुकूमानुसार दिनांक २५/३/१५ रोजी केली.

२. त्याचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७ अ अन्वये रूपये १५०००/— चा जामीन बंधपत्र दयावा.

पुणे
दिनांक — १३/११/२०१४

(सौ प्राची पी. कुलकर्णी)
विशेष न्यायाधीश, पुणे
लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून
सरंक्षण कायदयाअंतर्गत

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word for word as per original Judgment.

**Name of Stenographer : M.R. Saptarshi**
**Court Name : Prachi P. Kulkarni**

**Date – 13/11/2014**

**Judgment signed by the Presiding officer –13/11/2014**

**Judgment uploaded on -13/11/2014**

....